---------------------------------------------------------------------------------------------

एक जण बायकोला पार्लरमध्ये घेऊन गेला होता.

तो दोन तास बाहेर थांबला.

ती जशी बाहेर आली, तसा त्याचा त्याच्या डोळ्यांवर विश्वास बसेना.

तो म्हणाला, 'अगं, काय छान दिसतेयस तू !!! काय केलंस नक्की पार्लरमध्ये ?'

तेवढ्यात आतून आवाज आला, 'अहो, माझं व्हायचंच अजून'.

---------------------------------------------------------------------------------------------

नवरा-बायकोचं बोलणं सुरू असतं.

नवरा - मी तुझ्यावर खूप प्रेम करतो.

मी तुझ्यासाठी जीवसुध्दा देऊ शकतो.

...

बायको - तो तर कुणीही देईल हो, तुम्ही फक्त माझ्याबरोबर जगून दाखवा.

---------------------------------------------------------------------------------------------

शिक्षक : जर कुणी शाळेच्या समोर बॉम्ब ठेवला तर काय कराल?

विद्यार्थी : एक-दोन तास बघणार... कोणी नेला तर ठीक आहे...

नाहीतर स्टाफ रूममध्ये जमा करणार!

नियम म्हणजे नियम!!

---------------------------------------------------------------------------------------------